३२ उमेदवारांचा निर्णय 'यथावकाश'

पोलीस भरती; इडब्ल्यूएस व एसइबीसी वगळून इतरांची निवड जाहीर

नाशिक । प्रतिनिधी

राज्य पोलीस दलातील भरती प्रक्रियेत 'इडब्ल्यूएस' उमेदवारांच्या निवडीला स्थगिती मिळाल्यानंतर 'ईडब्ल्यूएस' व 'एसइबीसी' वगळून उर्वरित सर्व प्रवर्गातील उमेदवारांची पोलीस शिपाईपदी निवड झाली आहे. त्यांची अंतिम यादी जाहीर करुन नाशिक पोलीस आयुक्तालयाने ३२ जागांवर शासन आदेशानंतर निर्णय घेणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तर दोन जागांवर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी मिळणार आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या उमेदवारांना पोलीसपदी नियुक्तीसाठी अजूनही प्रतीक्षा करावी लागणार आहे.

३० जुलै रोजी पोलीस महासंचालक कार्यालयाने सर्व पोलीस घटकांना सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार, 'इडब्ल्यूएस'मधून निवड झालेल्या मराठा समाजातील उमेदवारांच्या निवडीसंदर्भात धोरण निश्चितीसाठी पोलिसांनी शासनाला विनंती केली आहे. याबाबतचा शासन आदेश प्राप्त होईपर्यंत पोलीस शिपाई भरतीमध्ये 'इडब्ल्यूएस'मधून तात्पुरती निवड झालेल्यांची उमेदवारी रद्द न करता प्रकरणे स्थगित ठेवावीत. मात्र, इतर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती देण्यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी. शासन आदेशानंतर 'इडब्ल्यूएस'मधील उमेदवारांच्या निवडीसंदर्भात यथावकाश कळविण्यात येईल, असे अपर पोलीस महासंचालक कार्यालयाने स्पष्ट केले आहे. त्यानुसार नाशिक शहर पोलिसांनी सुधारित निकाल जाहीर केला आहे.

नाशिक आयुक्तालयातील निकाल

प्रवर्ग – उमेदवार (अंतिम निवड यादी)	
खुला –	३८
इतर मागास प्रवर्ग –	०२
विशेष मागास प्रवर्ग –	०४
अनुसूचित जमाती –	२४
अनुसूचित जाती –	१९
एकूण –	८४

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारीपदी सोनवणे

नाशिक। प्रतिनिधी

लेफ्टनंट कर्नल विलास सोनवणे (निवृत्त) यांनी नाशिक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पदाचा पदभार स्वीकारला आहे. यावेळी त्यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सेवारत्न सैनिक, वीरपत्नी, वीरमाता-पिता, माजी सैनिक आणि त्यांचे अवलंबित यांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय तत्पर आहे. विशेषतः वीर पत्नी, वीर माता व वीर पिता आणि त्यांच्या अवलंबितांच्या कल्याणाकरिता विशेष मोहीम राबविण्यात येईल. माजी सैनिकांकरीता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा निवडीसंदर्भात करण्यात येईल.समन्वय समिती बैठकीचे आयोजन करण्यात येईल.

संशयितांचा जामीन रद्द करावा

पीडित महिलेची न्यायालयाकडे मागणी; आत्महत्येस प्रवृत्त प्रकरण

नाशिक । प्रतिनिधी

बदलापूर येथील एका कंपनीच्या भागीदारांनी नाशिक येथील व्यंकटेश कन्स्ट्रक्शनचे साडेचार कोटी रुपये थकवले. या थकबाकीमुळे या कंपनीचे भागीदार हेमंत विनायक पवार यांनी आत्महत्या केली होती. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. दरम्यान, या प्रकरणात न्यायालयाने ऑर्किड हाऊसिंग इन्फ्रा कंपनीच्या भागीदारांना अटकपूर्व जामीन देताना देश सोडून न जाणे व इतर अटी, शर्ती लागू केल्या होत्या. परंत, संशयितांनी या न्यायालयीन अटींचे उल्लंघन करुन परदेशवारी केल्याचा आरोप पीडित महिलेने केला आहे व त्यांचा जामीन रद्द करावा, असा अर्ज न्यायालयात दाखल केला आहे.

ऑर्किड हाऊसिंग इन्फ्रा एलएलपी कंपनीचे बदलापूर – मुंबई येथे काम सुरु होते. त्यांना नाशिक येथील व्यंकटेश कन्स्ट्रक्शन कंपनीने सर्व साहित्य पुरवले. त्याचे साडेचार कोटी रुपये झाले. मात्र, ऑर्किड कंपनीने त्यांना ही रक्कम अदा करण्यास नकार दिला. दीड ते दोन वर्ष पाठपुरावा करुनही पैसे मिळत नसल्याने व्यंकटेश कन्स्ट्रक्शनच्या तीन भागीदारांपैकी एक असलेले हेमंत विनायक पवार यांनी १६ मार्च २०२३ ला पहाटे घरी आत्महत्या केली होती. त्यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये ऑर्किड हाऊसिंग इन्फ्रा एलएलपी कंपनीचे संशयित कश्यप मेहता, शिवाजी इरमाळी, सुरेश जैन, सुनील कोठारी व मयंक जैन यांचे नाव लिहून आत्महत्येस कारणीभूत असल्याचा उल्लेख केला. पवार यांची पत्नी ओमप्रभा हेमंत पवार (रा.फ्लॅट.न.२, साईव्हिला अपार्टमेंट, पार्क साईड जवळ, इंदिरानगर) यांनी इंदिरानगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पाचही भागीदारांविरोधात पवार यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. नाशिक सत्र न्यायालयात हा खटला सुरु असून न्यायालयाने संशयितांना १९ जून २०२३ ला अटी शर्तीच्या अधीन राहून जामीन मंजूर केला. त्यात देश सोडून जाण्यास निर्बंध घातले होते. मात्र, संशयितांनी नियमांचे उल्लंघन करत परदेशवारी केली. तसेच इतर अटींचे उल्लंघन केल्याचा दावा ओमप्रभा यांनी केला असून, संशयितांचा जामीन रद्द करावा यासाठी पुन्हा न्यायालयात धाव घेतली आहे.

राष्ट्रीय कंपनी न्यायाधिकरणात दावा

व्यंकटेश कन्स्ट्रक्शन या कंपनीचे शैलेश श्रीराम बिर्ला, अशोक निंबा शेवाळे व कै.हेमंत विनायक पवार हे तिघे भागीदार आहेत. त्यांनी ऑर्किड कंपनीच्या बदलापूर येथील बांधकाम साईटचे काम घेतले होते. मात्र, या कंपनीने सन २०१६ नंतर बांधकामाचे पैसे देणे बंद केले. त्यामुळे व्यंकटेश कंन्स्ट्रक्शने थकबाकी प्रकरणी ऑर्किड हाऊसिंग इन्फ्रा कंपनीविरुध्द एनसीएलटी न्यायालयात दावा दाखल केला आहे.

कानबाईमातेची घरोघरी पूजा

पंचवटी । नाशिक शहर परिसरात राहणाऱ्या खान्देशातील बांधवांच्या घरी कानबाई मातेचा उत्सव साजरा केला जातो. दरवर्षी श्रावण महिन्याच्या पहिल्या रविवारी सायंकाळी घरोघरी कानबाई विधीवत पूजा करून बसविल्या जातात. रात्रभर भजन, जागरण गोंधळाचा कार्यक्रम करून दुसऱ्या दिवशी रामकुंडावर स्नान आणि पूजेसाठी आणल्या जातात. सोमवारी (दि. १२) या कानबाई घेऊन सहकुटुंबासह रामकुंडावर येत होत्या. स्नान, पूजा आणि आरती करून कानबाईंना घेऊन हे भाविक परतत होते. रामकुंडावर कानबाईला स्नान घालून तिची पूजा करण्यात येत होती. आरती करून प्रसादाचे वाटप करीत कानबाईचे भक्त घरी परतत होते. उत्तमनगर येथून सकाळी मिरवणूकीस प्रारंभ झाला. कानबाई माता उत्सव मिरवणूकीचा दुपारी तीन वाजता समारोप करण्यात आला. याप्रसंगी आ. सीमा हिरे, शिवसेना जिल्हाप्रमुख (ठाकरे गट) सुधाकर बडगुजर, शिवसेना महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, भाजपा उद्योग आघाडी प्रदेशाध्यक्ष प्रदीप पेशकार, भाजप शहराध्यक्ष प्रशांत जाधव आदी उपस्थित होते.

केटीएचएमची वाटचाल 'ऑटोनॉमस'कडे : ॲड.ठाकरे

नाशिक । प्रतिनिधी

मविप्र संस्थेच्या केटीएचएम महाविद्यालयाचीही वाटचाल 'ऑटोनॉमस'कडे सुरू असल्याचे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले. गंगापूर रोडवरील कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृहात केटीएचएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांच्या सेवापूर्ती सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ॲड. ठाकरे म्हणाले, केटीएचएम महाविद्यालयाला डॉ. साळुंखे, डॉ. भदाणे सरांसारख्या निष्ठावान प्राचार्यांची परंपरा लाभली आहे. डॉ. दरेकर यांनीदेखील कमी कार्यकाळात उल्लेखनीय कार्य केले. बोर्ड ऑफ स्टडी, मॅनेजमेंट कौन्सिल यांच्या माध्यमातून त्यांनी संस्थेला कायम मदत केली. त्यांच्या कार्यकाळात नवीन कोर्सेस व निधीदेखील मिळाला. महाविद्यालयाची ग्रेड ही भविष्यातदेखील 'ए प्लस प्लस' राहील, अशी आशा व्यक्त करताना नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत केटीएचएम महाविद्यालय अग्रेसर असल्याचे असे सांगितले.

कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, संचालक ॲड. संदीप गुळवे, ॲड. आर. के. बच्छाव, ॲड. लक्ष्मण लांडगे, शिवाजी गडाख कृष्णाजी भगत, प्रवीण जाधव, विजय पगार, रमेश पिंगळे, डॉ. सयाजी गायकवाड, महिला संचालक शोभा बोरस्ते मविप्रचे सर्व शिक्षणाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव यांनी प्रास्ताविक, तर डॉ. तुषार पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बोरस्ते यांनी आभार मानले. यावेळी मविप्र कार्यकारी मंडळाच्या उपस्थितीत डॉ. दरेकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

कारचा अपघात; दोघे जखमी

नाशिक : पुणेरोडवर गणेश बाबानगरकडे वळण घेत असताना नाशिकरोडकडून वेगात आलेल्या कारने धडक दिल्याने कारमधील दोघे जखमी झाले. राजू महाले, प्रवीण अहिरे असे दोघा जखमींची नावे आहेत. महेश हरिचंद्र वाघ (रा. साईराम अपार्टमेंट, अशोका मार्ग) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी (दि. १०) रात्री सव्वा नऊ वाजेच्या सुमारास अपघात झाला. वाघ हे महाले व अहिरे यांच्यासमवेत त्यांच्या कारने (एमएच ०१ बीएक्स ९६२६) द्वारकाकडून पुणे रोडने जात असताना नाशिक्लबच्या पुढे असलेल्या पंचरमधून गणेश बाबा नगरकडे वळण घेत होते. त्यावेळी नाशिकरोडकडून वेगात आलेल्या कारने (एमएच १४ जेई ५२८७) जोरदार धडक दिली. यात महाले, अहिरे यांना गंभीर मार लागला आहे. तर संशयित कारचालक पसार झाला.

साडेआठ लाखांचे दागिने लंपास

नाशिक । प्रतिनिधी

सातपूर पोलिसांच्या हद्दीतील पाईपलाईन रोड परिसरातील बंद बंगल्याच्या पाठीमागील खिडकीचे गज कापून चोरट्यांनी घरफोडी करीत तब्बल साडेआठ लाखांचे सोन्याचे दागदागिने चोरून नेले. याप्रकरणी सातपूर पोलिसात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, वाढत्या घरफोड्यांचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

मकरंद मधुकर सावरकर (५८, रा. मधुमालती बंगला, गुलमोहर विहार कॉलनी, पाईपलाईन रोड, सातपूर) यांच्या फिर्यादीनुसार, ते आयटी कंपनीत नोकरीला असून, शुक्रवारी (दि.९) ते कुटुंबीयांसह छत्रपती संभाजीनगर येथे गेले आणि रविवारी (दि. ११) परत आले. या दरम्यान चोरट्यांनी त्यांच्या बंद बंगल्याच्या पाठीमागील बेडरूमच्या खिडकीचे गज वाकवत ते कापून आत प्रवेश केला आणि कपाटातील ८ लाख ७१ हजार रुपयांचे सोन्याचे दागदागिने चोरून नेले. यात २ लाखांचा सोन्यांच्या बांगड्या, ६० हजारांच्या अंगठ्या, २ लाखांच्या सोन्याच्या चैन, ८० हजारांचा नेकलेस, ५२ हजारांचा सोन्याचे वेळे, ४० हजारांची सोन्याची चैन, ४४ हजारांची अंगठी, ८० हजारांचे मंगळसूत्र, २० हजारांचा चांदीचा गणपती, २० हजारांचे चांदीचे ताट, २५ हजारांचे चांदीचे बिस्किटे, १० हजारांची डायमंड अंगठी, २० हजारांचा डीजीटल कॅमेरा असा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे. याप्रकरणी सातपूर पोलिसात घाव घेत तक्रार दिली असून, गुन्हा दाखल झाला आहे. माहिती मिळताच, उपायुक्त मोनिका राऊत, सहायक आयुक्त शेखर देशमुख, सातपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजित नलावडे यांच्यासह गुन्हेशोध पथकाने भेट देत पाहणी केली व संबंधितांना सूचना केल्या.

भरदिवसा घरफोडी

श्रीधर विनायक भड (रा. निशा बंगला, साईनगर लेन, मेरी–रासबिहारी लिंकरोड) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी (दि. १०) सकाळी ११ वाजता ते कुटुंबीयांसह भाचीच्या साखरपुड्याला गेले होते. रात्री ९ वाजता आले असता, त्यांच्या बंगल्याच्या दरवाजाचे लॉक तोडून घरफोडी झालेली निदर्शनास आली. अज्ञात चोरट्यांनी ७७ हजारांची सोन्याची तुशी, ६३ हजारांचे सोन्याचे पेंडल, १५ हजारांची रोकड असा १ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. म्हसरुळ पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

बेलतगव्हाण उपसरपंचपदी पागेरे

देवळाली कॅम्प । येथील बेलतगव्हाण गावच्या उपसरपंचपदी आकाश पागेरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सिंधुबाई देवराम पवार यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंचपदासाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य आकाश पागेरे यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी अभिषेक उत्तम मते, उपसरपंच पदी आकाश पागेरे यांची निवड झाल्याचे घोषित केले. यावेळी सरपंचासह ग्रामपंचायत सदस्य पुष्पा धुर्जड, सिंधुबाई पवार, कांचन घोडे, अशोक कुटे, रामकृष्ण धुर्जड, जयप्रकाश धुर्जड, दीपक पागेरे, अक्षय कुटे, अवी उगले, हर्षद कुटे, स्वराज शिरसाट उपस्थित होते.

नातलगांत मारहाण

नाशिक : दोघा नातेवाइकांमध्ये मारहाण होऊन परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सतीश सत्यप्रकाश चव्हाण (रा. आनंदवल्ली, गंगापूर रोड) यांच्या फिर्यादीनुसार, ते इंदिरानगरमधील पेठेनगर रोडने पायी जात असताना नातेवाईक असलेल्या संशयित वरुण दिलीप परमार याने मेसेज केल्याची कुरापत काढून शिवीगाळ केली. त्यावेळी संशयिताने वीटेने मारून दुखापत केली. तर, वरुण परमार यांच्या फिर्यादीनुसार, संशयित सतिश चव्हाण याने कुरापत काढून कमरेच्या बेल्टने मारहाण केली. इंदिरानगर पोलिसात परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माजी महापौरांकडून खड्ड्यांची पाहणी

नाशिकरोड। परिसरात रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. रस्ते व खड्डे यांच्या दुरावस्थमुळे नागरिकांची नाराजी लोकप्रतिनिधींवर व्यक्त केली जात आहे. माजी महापौर दशरथ पाटील यांनी खंत व्यक्त केली. नाशिकरोड परिसरात रस्त्यांची पाहणी केली. रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळणी झाली असून, नाशिक शहराच्या महत्त्वाच्या मार्गावर वाहनधारकांना वाहन चालविणे मुश्किल झाले असून रोजच अपघाताला आमंत्रण होत आहे. माजी महापौर दशरथ पाटील यांना नागरिकांच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. तत्काळ त्यांनी सोमवारी सकाळी नाशिकरोड परिसरात रस्त्यांचा पंचनामा करून पाहणी दौरा केला.

कारच्या धडकेत युवक जखमी

नाशिक । आडगाव हद्दीतील यश लॉन्ससमोर भरधाव कारने पादचारी युवकाला पाठीमागून धडक देत जखमी केल्याचा प्रकार घडला आहे. रितुराजकुमार अशोक सिंग (१९, रा. गणेश होम्स, स्वराजनगर, आडगाव शिवार) यांच्या फिर्यादीनुसार, ३१ जुलै रोजी दुपारी पाऊण वाजेच्या सुमारास मित्र विमल यादव यांच्यासमवेत गणेश होम्सकडून कॅनाल रोडने यश लॉन्सच्या दिशेने पायी जात होता. त्यावेळी पाठीमागून वेगात आलेल्या कार (एमएच ०२ डीजे ५८८०) चालकाने जोरदार धडक दिली. यात रितूराजकुमार याचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला असून, संशयित कारचालक पसार झाला आहे. आडगाव पोलिसात गुन्हा दाखल आहे.

गिते यांच्याकडे मुख्य अभियंतापदाचा अतिरिक्त भार

नाशिक । नाशिकचे प्रादेशिक जलसंधारण अधिकारी हरिभाऊ कारभारी गिते यांच्याकडे मुख्य अभियंता तथा पदसिद्ध सहसचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. गिते यांनी त्यांच्या मूळ पदाचे कामकाज सांभाळून अतिरिक्त कार्यभाराच्या पदाचे कामकाज पहावे, असे शासकीय आदेशात म्हटले आहे.

राज्यात विविध ठिकाणी रिक्त प्रादेशिक जलसंधारण अधिकाऱ्यांच्या जागेवर जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांना पदोन्नती मिळाली आहे. विशेष म्हणजे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे स्वीय सहायक म्हणूनही ते कार्यभार सांभाळतात. राज्यातील आठ प्रादेशिक जलसंधारण अधिकाऱ्यांच्या बढतीचे आदेश मृद व जलसंधारण विभागाने बुधवारी (दि.१३) जारी केले. नाशिकचे हरिभाऊ गिते हे २२ फेब्रुवारी २०२२ पासून जिल्हा जलसंधारण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. अकोला व नाशिकचा कार्यभार सांभाळत असताना ३१ मे २०२३ रोजी काळे यांच्या निवृत्तीनंतर प्रादेशिक जलसंधारण अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभारही त्यांनी सांभाळला. राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना जलयुक्त शिवार दोनचा आराखडा तयार करुन त्याला मंजुरी मिळवण्यात गिते यांचा महत्वपूर्ण सहभाग राहिला. तसेच गाळयुक्त धरण, गाळयुक्त शिवार या अभियानाला त्यांनी गती दिली. पाण्याचे योग्य नियोजनाशिवाय कृषीचा विकास शक्य होणार नाही. राज्य स्तरावर या विभागात काम करण्यासाठी गीते यांची नियुक्ती झाली आहे. त्यासाठी जलयुक्त शिवार ही योजना प्रभाविपणे राबवण्याचा गिते यांचा मानस आहे.

डॉ. अपूर्व हिरेंना उच्च दिलासा

नऊ महिन्यांनंतर तुरुंगातून सुटका

नाशिक। प्रतिनिधी

कर्ज थकवल्याप्रकरणी तब्बल नऊ महिन्यापासून तुरुंगात असलेले शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उपनेते डॉ. अद्वय हिरे यांची मुंबई न्यायालयाने सोमवारी (दि.१२) जामीनावर सुटका केली आहे.

डॉ. हिरे यांनी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून २०१२ मध्ये मालेगाव येथील रेणुकादेवी सुतगिरणी संस्थेसाठी तीन कोटी ४० लाखांचे कर्ज घेत थकविले होते. या प्रकरणात हिरे यांच्याकडे बँकेचे एकूण ३५ कोटी ९० लाख रुपयांचे कर्ज थकले. हे कर्ज थकविल्याप्रकरणी डॉ. हिरे यांच्यासह इतरांवर मालेगाव शहरातील रमजानपुरा पोलीस ठाण्यात बँकेने फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्हात डॉ. हिरे यांना १३ नोव्हेंबर २०२३ रोजी भोपाळ येथून अटक करण्यात आली होती. त्यांना १६ नोव्हेंबर रोजी मालेगाव येथील अपर जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. व्ही. बघेले यांनी डॉ. हिरे यांना प्रारंभी पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. तेव्हापासून हिरे हे कोठडीतच होते. तर हिरे यांच्यावतीने वकिलांनी वेळोवेळी जामीनासाठी अर्ज केले होते. परंतु त्यांना जामीन नामंजूर होत होता. त्यानंतर त्यांनी जामीनासाठी मुंबई उच्च न्यायालयात अर्ज केला. परंतु तेथेही त्यांना दिलासा मिळत नव्हता. त्यानंतर हिरे यांनी पुन्हा मुंबई उच्च न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला. सोमवारी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश माधव जामदार यांच्या न्यायालयासमोर सुनावणी झाल्यानंतर त्यांचा जामीन मंजूर करण्यात आला.

निधन वार्ता...

राजेंद्र चंद्रमोरे

नाशिक । दैनिक 'देशदूत'चे कर्मचारी राजेंद्र दावल चंद्रमोरे (५३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.

तुकाराम पिंगळे

नाशिक । मातोरी, ता.जि. नाशिक येथील माजी सरपंच व नाशिक तालुका शेतकी सहकारी संघाचे माजी सभापती, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम (आण्णा) एकनाथ पिंगळे (६८) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, पत्नी, मुलगा, भावजया, पुतणे, सुना, नातू असा मोठा परिवार आहे.

ॲड. छाया भामरे

नाशिक । येथील नाशिक बार असोसिएशनच्या सदस्य ॲड छाया मधुकर भामरे(४५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे.

डॉ. निलेश झाल्टे

निफाड। वडाळी नजीक (ता. निफाड) येथील डॉ. निलेश झाल्टे (४१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, आई, वडील, भाऊ, बहीण असा परिवार आहे. येथील प्रगतिशील शेतकरी प्रमोद खंडेराव झाल्टे यांचे चिरंजिव तर मोतीराम खंडेराव झाल्टे यांचे ते पुतणे होते.

क्लासिफाईड / सुपरमार्केट

फ्लॅट विकणे

3 BHK फ्लॅट विकणे – गोविंदनगरजवळ कर्मयोगीनगर, रणभूमी ग्राऊंडजवळ, इंप्मेरिया बिल्डींग (Imperia Building) संपर्क : 8087240227, संपर्कातील वेळ : सकाळी ११ ते सायं. ५ वा. (14/08-BK-3977)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईस्टिस... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... !! नका करू... पेशंटला सांगा...!! नका सांगू... पेशंटला आणा... !! नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपचार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/25) (CRINV-23-24JL/CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalvenashamuktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/25) (CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा– अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/25) (CRINV-23-24JL/CRG00556)

विवाह विषयक

वर पाहिजे – वधू वय – २६, उंची – ५.३, गोरी, शिक्षण – दहावी, हिंदु फुलमाळी आईचे निधन झाले आहे. वडिलांचे पूजा सामग्री व फुलांचे दुकान, शेती ४ एकर, मुलीकरिता सर्वजातीय सामान्य वर चालेल. भ्रमणध्वनी क्रमांक 8378879264, 7517057842. (12/08/24)

व्यावसायिक

पार्टी प्लॉट मंगल कार्यालय इव्हेंट प्रोग्राम व लग्न समारंभासाठी बुकिंग चालू आहे. अडीचशे लोकांची कॅपेसिटी, २५० लोकांची राहण्याची सोय, प्रशस्त लॉन, ५०० लोकांची कॅपेसिटी, संपर्क हॉटेल साई श्रध्दा, पिवर व्हेज, साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशन जवळ – अनिल भाई, मो. 8888837700. (12/08)

नावात बदल

My OLD NAME RAM ROCHIRAM RAMCHANDNAI HAS BEEN CHANGED TO MY NEW NAME RAMCHAND ROCHIRAM RAMCHANDANI AS PER AADHAR CARD (Bk-4002)

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/ शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग**, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देवा बैकेच्या वरती, विटको पॉइंट. ०२५३-२४६२७५६ ◆ **निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॉन्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆**दिंडोरी** : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆**मालेगांव** : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्यजवळ. ०२५५४-२४३४६२२◆**सिन्नर** : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.